**फौ.कि.अर्ज.क. १४६/२०१७**

वर्षाराणी **वि.**योगेश **निशाणी ५**

सी.एन.आर.नं.महा—पु—१८—०००७६४—२०१७

.....................................................................................................

**फौ.कि.अ.क्र.१४६/२०१७**

## निशाणी ५ खालील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३ प्रमाणे अंतरीम पोटगी मिळावी यासाठी दिलेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार व जाबदेणार क्र. १ हे पती पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा त्यांचा मुलगा आहे. जाबदेणार हा अर्जदार यांना सांभाळत नाही तसेच उदरनिर्वाहची कोणतीही सोय करत नाही. जाबदेणाराने सदनिका खरेदी करण्यासाठी अर्जदाराकडे रूपये दहा लाख रक्कमेची मागणी केली होती तसे. दुसरे लग्न करण्याचे धमकी दिली होती. जाबदेणार याने अर्जदार यांना न नांदवता घरातुन हाकलून दिले. अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असून तिला उत्पन्नाचे साधन नाही. जाबदेणार हा नोकरी करत असून त्याला दरमहा पंधरा ते वीस हजार रूपये पगार मिळतो. तसेच जाबदेणार याला आठ ते दहा एकर बागायत शेती असून त्याचे उत्पन्न मिळते. जाबदेणार याने मौजे देवाची उरूळी येथे दुमजली इमारत बांधली असून ती भाड्याने दिली आहे. अर्जाचा निकाल लागण्यासाठी कालावधी लागणार आहे परंतु तो पर्यंत अर्जदार यांना जाबदेणार याचेकडुन दरमहा रूपये दहा हजर अंतरीम पोटगी देण्याचा हुकुम व्हावा अश विनंती केली.

**२.** जाबदेणार याने निशाणी १२ कडे म्हणणे देवून अर्जातील सर्व कथनांचा इनकार केला. जाबदेणार याचे कथनाप्रमाणे अर्जदार यांनी

..........................................................................................

महत्वाच्या बाबी लपवून अर्ज केला आहे. अर्जदाराने दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बारामती येथे हिंदु विवाह अर्ज क्रमांक २८७/२०१५ दाखल केला असून त्यामध्ये तिला दरमहा रूपये पंधराशे अंतरीम पोटगी मंजुर झालेली आहे. अर्जदाराचे शिक्षण झालेले असून तिला दरमहा रूपये दहा हजार पगार मिळतो. जाबदेणार याचेकडे अर्जदाराला देण्यासाठी पैसे नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**३.** अर्जदार व जाबदेणार तर्फे सर्व तोपरी युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली. अर्जदाराच्या कथनानुसार जाबदेणार याने अर्जदारांना घरातुन शारीरिक व मानसिक त्रास देवून हाकलून दिले आहे. मुळ अर्जातील कथने व जाबदेणार यांनी केलेली आक्षेप घेणारीकथने यांचा विचार करता केलेले आरोप व प्रत्यारोप सिध्द करण्यासाठी पुरावा घणे आवश्यक आहे. आजरोजी अर्जदाराच्या कथनाप्रमाणे ती माहेरी राहत आहे. अर्जदार क्र. २ हा सतत आजारी असतो व त्याचा औषधोपचारासाठी तिच्याकडे पैसे नाही. जाबदेणार यांच्या कथनांचा विचार करता अर्जदार स्वतःहुन घर सोडून गेली आहे. अर्जदाराने निशाणी ३ सोबत लग्नपत्रिका, लग्नाचा फोटो व अर्जदार क्र. २ च्या जन्माचा दाखला हजर केला आहे. तसेच निशाणी १७ सोबत जाबदेणार याला दरमहा रूपये आठ हजार पगार असल्याचा दाखला हजर केला आहे. निशाणी १९ सोबत अर्जदारानी जाबदेणार क्र. २ व ३ यांचे नावे असलेल्या मिळकतींचे उतारे दाखल केले आहे. तसेच अर्जदार क्र. २ च्या औषधोपचाराच्या दवाखान्याची कागदपत्रे दाखल केलेल आहे.

**फौ.कि.अर्ज.क. १४६/२०१७**

वर्षाराणी **वि.**योगेश **निशाणी ५**

सी.एन.आर.नं.महा—पु—१८—०००७६४—२०१७

..........................................................................................

**४.** जाबदेणार यांनी निशाणी २२ सोबत हिंदु विवाह अर्ज क्र. २८७/२०१५ मधील अर्जदाराने निशाणी १५ कडे दिलेल्या अंतरीम पोटगीसाठीच्या अर्जाची व आदेशाची प्रत दाखल केली आहे. सदर आदेशाप्रमाणे अर्जदाराला रक्कम रूपये १७००/— प्रमाणे दरमहा अंतरीम पोटगी देण्यात आलेली आहे. सदर पोटगी संदर्भात अर्जदाराने मुळ अर्जात उल्लेख केलेला नाही. कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदयातील कलम प्रमाणे इतर कायदयातील तरतुदीप्रमाणे जरी अर्जदाराला पोटगी देण्यात आली असली तरी सुध्दा या कायदयाप्रमाणे पोटगी देता येवू शकते. सदर तुरतुदीचा विचार करता दरमहा रूपये १७००/— एवढया रकमेमध्ये अर्जदार क्र. १ व २ यांचा उदरनिर्वाह व औषधोपचार होणे शक्य नाही. जाबदेणार याचा पगार, शेतजमिन अशा उत्पन्नचा विचार करता मुळ अर्ज निकाली होई पर्यंत त्याने अर्जदारासाठी दरमहा रूपये १५००/— प्रमाणे अंतरीम पोटगी देणे योग्य होईल. सबब वरील सर्व कारणांचा विचार करता मी पुढील आदेश देत आहे.

## आदेश

**१.** अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

**२.** जाबदेणार क्र. १ याने अर्जदार क्र. १ व २ यांना एकत्रित दरमहा रूपये १५००/— प्रमाणे अंतरीम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून देण्याची आहे.

दौंड.
दिनांक :—१४/०३/२०१८

**( सुमित वि. जोशी )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड.

**फौ.कि.अर्ज.क. १४६/२०१७**

वर्षाराणी **वि.**योगेश **निशाणी ५**

सी.एन.आर.नं.महा—पु—१८—०००७६४—२०१७

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : T.R.Bagawan,

Court Name : S.V.Joshi
Judicial Magistrate First Class Daund.

Date of Judgment : 14/03 /2018

Judgment signed by presiding officer on : 14/03 /2018

Judgment uploaded on : 15/03 /2018

**फौ.क्रि.अर्ज.क्र. १४६/२०१७**

वर्षाराणी **वि.**योगेश **निशाणी ५**

सी.एन.आर.नं.महा—पु—१८—०००७६४—२०१७